Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

नोव्हेंबर - २०२५ | बारावा अंक

## सायबर सिक्युरीटी विशेषांक





**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary

## Guest Editor Rtn.Prashanr Bhatgave



प्रिय रोटेरियन बांधवांनो,

आजचा काळ डिजिटल क्रांतीचा आहे. प्रत्येक व्यवहार, संवाद आणि कामकाज आता ऑनलाईन होत आहे.आपण इंटरनेटच्या माध्यमातून जगाच्या प्रत्येक कोपऱ्याशी जोडलेलो आहोत.परंतु या सोयीबरोबरच वाढले आहेत अनेक नवे धोके सायबर गुन्हेगारीचे.सायबर सुरक्षा ही केवळ संगणक तज्ज्ञांची जबाबदारी नाही,तर प्रत्येक डिजिटल नागरिकाची जाणीव आणि कर्तव्य आहे.ई-मेल, सोशल मीडिया, बँक व्यवहार  प्रत्येक ठिकाणी सतर्कता आवश्यक आहे.एका चुकीच्या क्लिकमुळे आपली वैयक्तिक माहिती, पैसा किंवा ओळख धोक्यात येऊ शकते.म्हणूनच ''सावधानता हीच खरी सुरक्षा'' हा मंत्र आजच्या युगात अत्यंत महत्त्वाचा ठरतो.मजबूत पासवर्ड, दोन स्तरांची प्रमाणीकरण प्रणाली, आणि डेटा बॅकअप या साध्या सवयी मोठे धोके टाळू शकतात. शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयामध्ये सायबर शिक्षणाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.तरुण पिढीला इंटरनेटचा जबाबदारीने वापर करण्याची सवय लावली पाहिजे.तंत्रज्ञानाचा वापर करताना विवेक, संयम आणि जागरूकता हीच खरी कवच आहेत.भारत देश डिजिटल महासत्ता बनत असताना,सायबर सुरक्षा ही आपल्या विकासाच्या प्रवासातील सर्वात महत्त्वाची कडी ठरते.सुरक्षित डिजिटल समाज निर्माण करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.सायबर सुरक्षेच्या माध्यमातून आपण केवळ स्वतःच नव्हे,तर आपल्या देशाचं डिजिटल भविष्यही सुरक्षित करू शकतो.

रो.प्रशांत श्रीधर भाटगावे
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- मिटींग क्र. १८
- जॉईंट मिटींग वुईथ रोटरी क्लब ऑफ  लातूर
- मिटींग ची सुरुवात फोर वे टेस्ट ने झाली
- फोरवे टेस्ट चे वाचन रो. प्रमोद कुंभार यांनी केले.
- अध्यक्ष रो. कायमखानी यांनी सर्वांचे स्वागत केले.
- मिटींग क्र. १७ चे वाचन सचिव रो. पवन मालपाणी यांनी केले.
- गेस्ट दयानंद पाटील यांचा परीचय करून देण्यात आला
- गेस्ट पोलीस निरीक्षक दयानंद पाटील यांनी सायबर गुन्हे कसे घडतात व ते कसे टाळता येतील याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.
- प्रश्नोत्तरे चे सत्र पार पडले.
- क्लब बुलेटिन : ची माहिती रो. अमोल बनाळे यांनी दिली अनावरण गेस्ट पोलीस निरीक्षक दयानंद पाटील व दोन्ही क्लब चे अध्यक्ष व सचिव व अतिथी संपादक रो. मोतीलाल वर्मा यांच्या हस्ते झाले
- डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स साठी अधिकाधिक रजिस्ट्रेशन करावे असे आवाहन अध्यक्षांनी केले.
- फेलोशिप अनाउन्समेंट रो. श्रध्दानंद अपशेट्टी  यांनी केली

**Guest of The Meeting**



PI Dayanand Patil

**Man of The Meeting**



Rtn.Anup Devanikar

**1st Come in the Hall**



Rtn.Pramod Kumbhar

# सायबर सुरक्षा ही काळाची गरज

आजच्या डिजिटल युगात संगणक, इंटरनेट, स्मार्ट फोन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. आपले बँकिंग, शिक्षण, व्यवसाय, आरोग्यसेवा, सरकारी कामकाज सर्वच क्षेत्र आता ऑनलाइन झाले आहे. या सर्व डिजिटल सोयींच्या पार्श्वभूमीवर एक मोठा आणि गंभीर प्रश्न उभा राहतो तो म्हणजे सायबर सुरक्षेचा.

**सायबर सुरक्षा म्हणजे काय ?**

सायबर सुरक्षा म्हणजे इंटरनेटवर किंवा संगणक नेटवर्कवर होणाऱ्या हल्ल्यांपासून, माहितीच्या गैरवापरापासून आणि डिजिटल फसवणुकीपासून स्वतःचे, आपल्या संस्थेचे किंवा समाजाचे रक्षण करणे.यात संगणक, मोबाईल, सॉफ्टवेअर, नेटवर्क, डेटा आणि डिजिटल ओळख या सर्व घटकांचे संरक्षण करणे आले.

**सायबर हल्ल्यांचे प्रकार**

सायबर गुन्हेगार आज अत्यंत प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध प्रकारचे हल्ले करतात. काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे

फिशिंग (Phishing): बनावट ई-मेल किंवा संदेशाद्वारे वैयक्तिक माहिती मिळवणे.

रॅन्समवेअर (Ransomware): संगणकातील डेटा लॉक करुन खंडणी मागणे.

मालवेअर (Malware): डेटा चोरीसाठी किंवा सिस्टम क्रॅशसाठी वापरले जाणारे व्हायरस.

डेटा चोरी (Data Breach ): बँक, कंपनी किंवा शासकीय संस्थांची संवेदनशील माहिती लीक होणे.

सोशल इंजिनिअरिंग : लोकांना फसवून त्यांच्याकडून पासवर्ड किंवा माहिती मिळवणे.

**सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व**

भारत हा जगातील सर्वातमोठा इंटरनेट वापरकर्ता देशांपैकी एक आहे. ८० कोटीहून अधिक लोक इंटरनेट वापरतात, आणि त्यामुळे सायबर धोकेही वाढत आहेत.दररोज हजारो फसवणूक प्रकरणे, बँक खात्यांवरील हल्ले, फ्रॉड,बनावट वेबसाइट्स, आणि सोशल मीडियावरील ब्लॅकमेलिंग यांची नोंद होत आहे.म्हणूनच, सायबर सुरक्षा ही आता फक्त आयटी व्यावसायिकांची जबाबदारी राहिलेली नाही, तर ती प्रत्येक नागरिकाची जीवनशैलीतील सवय बनणे गरजेचे आहे.

**स्वतःचे संरक्षण कसे करावे ?**

१. मजबूत पासवर्ड वापरा  अक्षरे, अंक आणि चिन्हांचा वापर करा, आणि नियमितपणे पासवर्ड बदला.

२.दुहेरी प्रमाणीकरण (Two Factor Authentication) सक्रिय ठेवा.

३.अनधिकृत लिंक्सवर क्लिक करु नका.

४.मोबाईल ॲप्स फक्त अधिकृत ॲप स्टोअरमधूनच डाउनलोड करा.

५.महत्त्वाच्या डेटाचा बॅकअप घ्या.

६.सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती कमी शेअर करा.

७.सायबर गुन्ह्याची तक्रार http://www.cybercrime.gov.in या सरकारी पोर्टलवर करा.

**सरकार आणि संस्थांची भूमिका**

भारत सरकारने सायबर क्राइम हेल्पलाइन (१९३०) आणि राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण (National Cyber Security Policy) लागू केले आहे. अनेक शैक्षणिक संस्था, एनजीओ आणि रोटरी सारख्या सामाजिक संस्था नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे काम करत आहेत.शाळा-कॉलेज पातळीवर ''सायबर हायजिन'' शिकवणे तितकेच महत्त्वाचे ठरत आहे, जसे आपण स्वच्छता किंवा आरोग्य शिक्षण शिकतो.

**निष्कर्ष**

जग डिजिटल होत आहे, आणि त्यामुळे ''सायबर सुरक्षा हीच खरी राष्ट्रीय सुरक्षा'' बनली आहे.व्यक्ती, संस्था आणि समाज  सगळ्यांनी एकत्र येऊन सायबर जबाबदारी अंगीकारली, तरच आपण सुरक्षित, विश्वासार्ह आणि पारदर्शक डिजिटल भारत घडवू शकतो.

**महत्त्वाचे सायबर हेल्पलाइन क्रमांक:**

❋ सायबर हेल्पलाइन: १९३०

❋ तक्रार नोंदणी पोर्टल: http://www.cybercrime.gov.in

❋ CERT-In (Computer Emergency Response Team): www.cert-in.org.in .

रो.अमोल बनाळे

# Rotary Mid Town this Week  Photo Gallery







# अभिनंदन



आपले सदस्य
रो.दिलीपजी सोनी
यांची
प्रांत ग्राहक संरक्षण
परिषद समितीच्या
महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष
पदी नियुक्ती झाली



आपले सदस्य
रो.प्रा.ओमप्रकाशजी झुरळे सर
यांना शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची
दखल घेत मुंबई येथे राज्यस्तरीय
लोकसंसद जनप्रेरणा शिखर
पुरस्कार-२०२५ ने सन्मानित
करण्यात आले.


स्थापना : १९९७ स्नेह ! सौख्य !! साफल्य!!!

## लक्ष्मी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., लातूर

मुख्य कार्यालय : 16/7, कव्हा रोड, मार्केट यार्ड, लातूर. 413 512 Ph. : (02382) 251753, 259753
: laxmi_urban@lucbank.in : www.lucbank.in

- ३१ मार्च २०२५ अखेरीस ठेवी १६८.७७ कोटी,
- कर्जवाटप १२०.६४ कोटी
- मागील सतत ४ वर्षापासून "बँको ब्लू रिबीन" पुरस्कार मिळवणारी बँक
- विविध डिजीटल बँकींग सुविधा पुरविणारी जिल्ह्यातील सहकारी बँकामधील पहिली बँक

बँकेच्या सभासद, ग्राहक व हितचिंतकांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

- लक्ष्मी वास्तू संकल्पपूर्ती कर्ज योजना
- Mobile Banking App, UPI, IMPS, QR Code, Rupay ATM Cad सुविधा • आधार लिंकींग
- DBT द्वारे शासनाच्या सर्व योजनांची सबसिडी / रक्कम खात्यात जमा करून घेण्याची सुविधा असलेली बँक. • फ्रँकींग सुविधा उपलब्ध.

वैशिष्ट्ये :
* सर्व सामान्यांच्या जिव्हाळ्याची बँक
* विविध ठेव योजना व आकर्षक व्याजदर
* कोअर बँकिंग, SMS, ई-मेल स्टेटमेंट सुविधा
* NEFT, RTGS व NACH सेवा उपलब्ध आहे.
* Income Tax, GST व ईतर टॅक्स भरण्याची सुविधा
* अटल पेन्शन योजना व प्रधानमंत्री आवास योजना
* शाखेतून विविध प्रकारचे बील भरण्याची सुविधा
* सर्व शाखेतून ७/१२, ८ अ, फेरफार ई. सुविधा
* विमा सेवा

शुभेच्छुक :

| अशोक श्रीकिशनजी अग्रवाल | सतीष तात्याराव भोसले | अविनाश भारतराव आळंदकर |
|---|---|---|
| चेअरमन | व्हा. चेअरमन | प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी |

संचालक मंडळ : सर्वश्री, सूर्यप्रकाश मुरलीधरजी धूत, लक्ष्मीकांत मोतीलालजी सोमाणी, अजीतलाल हिरालालजी आळंदकर, शशिकांत जयंतराव मोरलावार, डॉ. अनिल कांताप्रसादजी राठी, गणेश हनुमानदासजी हेड्डा, आशिष अशोकजी अग्रवाल, विशाल बाळकृष्णजी हलवाई, सौ. रचना शिवकांतजी ब्रिजवासी, सौ. कमलादेवी विजयकुमारजी राठी, सौ. माला ओमप्रकाशजी भुतडा, कु. सुवर्णा मारोतीराव पवार,
तज्ञ संचालक : सी.ए. किशोर बन्सीलालजी भराडिया, सी.ए. राजेश ब्रिजकिशोरजी अग्रवाल
व्यवस्थान मंडळ सदस्य : लक्ष्मीकांत सोमाणी (अध्यक्ष), शशिकांत मोरलावार (सदस्य), सी.ए. राजेश अग्रवाल (सदस्य), सी.ए. पुरुषोत्तम करवा (सदस्य), सी.ए. राधेशाम बियाणी (सदस्य) व सर्व स्थानिक सल्लागार, कर्मचारी वर्ग, पिग्मी प्रतिनिधी

आकर्षक कर्ज योजना :
* वैयक्तिक कर्ज योजना
* वाहन कर्ज योजना
* वेअरहाऊस, माल तारण कर्ज योजना
* गृह कर्ज योजना
* कॅश क्रेडीट कर्ज योजना
* व्यवसाय कर्ज योजना
* मालमत्ता तारण कर्ज
* सोलार पॅनल कर्ज
* पगार तारण कर्ज योजना
* मुदती कर्ज योजनस
* प्रोफेशनल कर्ज योजना

बँकेच्या एकूण शाखा : १. मुख्य शाखा - मार्केट यार्ड, लातूर २. छ. शिवाजी म. चौक लातूर ३. मार्केट यार्ड, जळकोट ४. शिवाजी चौक मुरुड ५. सराफ लाईन, अहमदपूर ६. शिवपुरी रोड, उमरगा ७. बीड रोड, माजलगाव ८. जुना मोंढा, नांदेड